महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM


* उत्सुकता *





RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – १२ वे ■ अंक क्र. – १६२ ■ सोमवार दि.१२ जानेवारी २०२६ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४


# नाशिक जिल्ह्यात दोन पीएसआय सह दोन खाजगी पंटर विरोधात दोन लाखांच्या लाच प्रकरणी गुन्हा दाखल

## लाचलुचपत प्रतिबंधक नाशिक विभागाची कारवाई

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कोळपेवाडी प्रतिनिधी :- मुंबईनाका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळवून देण्यासाठी दोन लाख रुपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी मुंबईनाका पोलीस ठाण्यात कार्यरत असणाऱ्या दोन पोलीस उपनिरीक्षकांसह खाजगी दोन पंटर विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. ही कारवाई शुक्रवारी रात्री शासकीय विश्रामगृह, नाशिक येथे करण्यात आली.

या प्रकरणी एकनाथ गंगाराम पाटील, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. नाशिक यांनी फिर्याद दिली आहे. आरोपींविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ (अ) व १२ अन्वये गुन्हा मुंबईनाका पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणात रंगेहाथ लाच स्विकारलेले आरोपींमध्ये दत्तात्रय एकनाथ गोडे, पोलीस उपनिरीक्षक, मुंबईनाका पोलीस ठाणे, नाशिक अतुल भुजंगराव क्षीरसागर, पोलीस उपनिरीक्षक, मुंबईनाका पोलीस ठाणे, नाशिक रमेश गंभीरराव आहीरे (वय ६१), उपहारगृह चालक, शासकीय विश्रामगृह, नाशिक व कल्पेश रमेश आहीरे (वय २८), उपहारगृह चालक, शासकीय विश्रामगृह, नाशिक (खाजगी इसम) यांचा समावेश आहे.

ला.प्र.वि.कडून मिळालेल्या माहितीनुसार, मूळ तक्रारदार यांच्या विरोधात मुंबईनाका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गु.र.नं. ३२५/२०२५ (बी.एन.एस. ३१६(२), ३१८(४), ३३६(२) (३)(४), ३३८, ३४०(२)) या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळवून देण्यासाठी तपास अधिकारी दत्तात्रय गोडे अतुल शिरसागर यांनी खाजगी इसम कल्पेश आहीर यांच्या मार्फत दोन लाखाच्या लाचेची मागणी केली. १० जानेवारी २०२५ रोजी रात्री ११.१५ वाजण्याच्या सुमारास शासकीय विश्रामगृह, नाशिक येथील उपहारगृहाच्या पाठीमागील बाजूस सापळा कारवाई दरम्यान दोन लाख रुपयांची लाच स्वीकारण्यात आली, यामध्ये ३० हजार रुपये चलनी नोटा व १ लाख ७० हजार रुपये अचलनी स्वरूपात असल्याचे निष्पन्न झाले. ही रक्कम रमेश आहीरे याने पीएसआय दत्तात्रय गोडे यांच्यासाठी स्वीकारल्याचे तपासात स्पष्ट झाले असून पीएसआय अतुल क्षीरसागर व दत्तात्रय गोडे यांनी लाच स्वीकारण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचाही गुन्ह्यात समावेश करण्यात आला आहे. या यशस्वी सापळा कारवाईत एकनाथ पाटील (पोलीस उपअधीक्षक), पो.हवा. २५२ योगेश साळवे व पो.हवा. २५३८ दिनेश खैरणार (ला.प्र.वि. नाशिक) सहभागी होते.

या कारवाईस पोलीस अधीक्षक भारत तांगडे, तसेच अप्पर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी व सुनील दोरगे यांचे मार्गदर्शन लाभले.

# सुरेगाव रयत संकुलाच्या प्राथमिक विद्यालयातील सि.सी.टिव्ही चोरी मागील गौड बंगाल काय ?

## पोलिसांना अद्यापही सापडले नाही चोरटे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कोळपेवाडी प्रतिनिधी:-कोपरगाव तालुक्याच्या पश्चिम भागातील मौजे सुरेगाव पोस्ट कोळपेवाडी येथील रयत संकुलाच्या प्राथमिक विद्यालयातुन चोरीला गेलेल्या सिसि टिव्ही मागील गौड बंगाल काय असा प्रश्न उपस्थित होत असुन कोपरगाव पोलीस स्टेशन ला अद्याप चोराचा तपास लागला नसल्याने चोरीचे गुढ अद्यापही कायम आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था हि महाराष्ट्र भर आपल्या शैक्षणिक गुणवत्ते साठी प्रसिद्ध असुन दर्जेदार शिक्षण हा संस्थेचा पाया असल्याने याकडे शिक्षणाची न्यान गंगोत्री म्हणून बघीतले जाते पुणे नंतर सुरेगाव कोळपेवाडी संकुलाचे आदराने नाव घेतले जाते या शैक्षणिक संकुलातील प्राथमिक विद्यालयात शिक्षणासाठी येणाऱ्या चिमुरड्या विद्यार्थी वर्गा सुरक्षिततेसाठी बसवण्यात आलेल्या सि सि टिव्ही कँमेर्याची काही दिवसांपूर्वी झालेल्या चोरीचा गुन्हा कोपरगाव पोलीस स्टेशन ला दाखल असतांना अनेक दिवसा नंतरही यंत्रणेला तपास लागत नसल्या बाबत आश्चर्य व्यक्त होत असुन सिसीटिव्ही चोरीला गेले कि काही पडद्या मागील गैर क्रुत बाहेर येवु नये यासाठी पध्दत शिर पणे पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने चोरी घडवून आनली कि काय अशी शंका आत्ता उपस्थित होत आहे. कर्मवीर भाऊराव पाटला नंतर स्वर्गीय शंकरराव काळे साहेबांनी रयत शिक्षण संस्थेच्या कार्य विस्तारासाठी जिवाचे रान करत स्वतःला प्रवाहात वाहुन घेतल्याने त्यांचे नाव रयत मध्ये आदराने घेतले जाते. सुरेगाव कोळपेवाडी रयत संकुलावर त्याचे विशेष लक्ष असायचे ध्येयाने प्रेरित असलेले मुख्याध्यापक शिक्षक वर्गाच्या न्यान दानाच्या कडक शिस्तबद्ध चाकोरी मुळे अनेक विद्यार्थी घडले गेल्याने संकुल आजही नावारूपाला आहे. स्वंर्गिय शंकरराव काळे साहेबांनी गैरप्रकारांना कधिही पाठिशी घातले नाही, गैर प्रकरणाची संपूर्ण शहानिशा करुन चुकीच्या क्रुतीचे कधीही समर्थन केले नाही आज प्राथमिक विद्यालयातुन चिमुरड्याच्या ताटात हप्त्यामधुन एक दिवस मिळणारा पुरक पोषण आहार कागदोपत्री दाखवून वरिष्ठांची दिशाभूल केली जाते. २६ जानेवारी १५ आँगस्ट गोपाल काला या दिवशी पालका समोर पुरक आहार वाटल्याचा गाजावाजा करुन ईतर वेळी चिमुरड्यांच्या तोंडात जाणारा घास हिरावून आर्थिक फायद्यासाठी वेगवेगळ्या लुप्त्या लढवल्या जातात. गैर प्रकाराना साहेबांनी कधी पाठिशी घातले असते का? ईथे मात्र गैर प्रकार उघडकीस आनणार्या घटकासच आरोपी च्या पिजंर्यात उभे करण्यासाठी काही यत्रंना कार्यरत असुन स्थानिक नेतृत्व सत्यता न तपासता गोतावळ्यात गुरफटून जात असल्याचा आजवरचा अनुभव असल्याने तक्रार करण्यास कुणीही धजावत नसल्याने गैरप्रकार वाढले आहे. शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणी साठी शाळा व्यवस्थापन समिती कार्यरत असुन त्यांनी आपले काम चोखपणे बजावण्याची गरज आहे. स्थानिक स्कूल कमेटी ने आपली जबाबदारी ओळखून गैर प्रकार करण्या विरोधात कठोर पाउले उचलण्याची मागणी पालक वर्गातुन होत आहे.

# अज्ञात आजाराने ६ गाईंसह १ म्हैस दगावली

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर – येथील सालकाडे वस्तीवरील पशुपालकांची सात ते आठ दुभती जनावरे अज्ञात आजाराने दगावल्याने पशुपालक व शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.या रोगामुळे जनावरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून दुग्ध व्यवसाय धोक्यात आला आहे.याबाबत अधिक माहिती अशी की गेल्या दहा बारा दिवसांपासून येथील सालकाडे वस्ती व परिसरात सुमारे पन्नास पेक्षा अधिक जनावरांना अज्ञात आजाराची लागणं झालेली आहे.या अज्ञात आजाराने बंडू सालकाडे यांच्या सहा गायी टप्प्याटप्प्याने दगावल्या तर पुंजाराम सालकाडे यांची एक म्हैसही दगावली. प्रभावग्रस्त गोठ्यांना पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. राहुल कोठाळे यांच्या समवेत पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. कपिल तोरण पवार व डॉ. पुजा देशमुख,पशु पर्यवेक्षक योगेश शिंदे आदींनी भेट देऊन मृत जनावरांचे शवविच्छेदन केले.




## ५३ वे विज्ञान जिल्हास्तरीय प्रदर्शनात न्यू इंग्लिश स्कूल भारम शाळेला उत्तेजनार्थ बक्षीस

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी ५३ वे नाशिक जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात भारम येथील न्यू इंग्लिश स्कूल शाळेचे विद्यार्थी शिवानंद भगवान रोठे व अनिकेत सोमासे यांनीआपल्या इलेक्ट्रिक प्रयोगाचे डीसी टू एसी प्रात्यक्षिक सादर करून बारा होल्ट च्या बॅटरी पासून २४० होल्ट करंट तयार करून पुन्हा त्या करंट पासून बॅटरी चार्ज होते व ती बॅटरी सोलर वर पण चार्ज करून ठेवून आपण बॅटरी पासून रात्री सुद्धा वापर करू शकतो.असे प्रात्यक्षिक सादर केले.या प्रयोगाला तालुकास्तरीय प्रदर्शनात प्रथम, तर जिल्हास्तरीय प्रदर्शनात उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. आहे यामुळे अगदी ग्रामीण भागातील शाळेचे विद्यार्थी देखील कमी नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. यामुळे पुन्हा एकदा न्यू इंग्लिश स्कूल भारम शाळेचे नाव जिल्हास्तरावर आले आहे. त्यासाठी संस्थेचे अध्यक्ष शिक्षक व इतर कर्मचारी व त्यास मार्गदर्शन करणारे शिक्षक चौधरी सर व श्री पवार सर तसेच त्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. एम. व्ही. आवारे सर,व इतर शिक्षक कर्मचारी विद्यार्थी तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व इतरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## साल नवे २०२६

काळासोबत आयुष्य धावते
चक्र वेळेचे फिरत राहते
दरवर्षाला बदलते साल नवे
नव्या जुन्याची जाणीव होते

गेल्या सालाची उणीव राहते
वर्ष आपले बदलत जाते
मूल्य पैशाचे वाढत राहते
घटते आयुष्य अन् वय वाढते

काळासोबत जीवन धावते
पेलण्यास रोजची नवी आव्हाने
फुटतात दररोज आशेचे पंख नवे
रोज अपेक्षांचे घेऊन ओझे
झेपावतात यशाच्या शिखराकडे

प्रत्येक साल नवे नवे
माणसाला घेऊन जाते निश्चित
ध्येयाकडे
आनंदी हावभाव शुभेच्छांचा वर्षाव
नववर्षाला जिकडे तिकडे कानी पडे

नववर्षाच्या उंबरठ्यावर ..यश कीर्ती
आनंदाचे
जीवनाचे पर्व नवे ..जीवन आपले
बहरून जावे.
ह्याच शुभेच्छांनी नवे साल २०२६
आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात यावे.

**कवी- शांताराम वाघ.मनमाड.**
**मो.८०८७४९३४५३.**

# राजमाता जिजाऊ : 'हिंदवी स्वराज्या'ची प्रेरक शक्ती

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दरवर्षी १२ जानेवारी रोजी जिजाऊ जयंती साजरी केली जाते. १६ व्या शतकात एका बाजूला जुलमी राजवटींचा अंधार होता आणि दुसऱ्या बाजूला रयतेच्या मनात साचलेली गुलामीची भीती. अशा कठीण काळात एका तेजस्वी विचाराचा जन्म झाला, ज्याने या मातीला तिचे स्वराज्य मिळवून देण्याचे स्वप्न पाहिले. राजमाता जिजाऊ या केवळ एका छत्रपतींच्या माता नव्हत्या, तर त्या स्वराज्याच्या पहिल्या संकल्पक, कुशल प्रशासक आणि नीतीमान मार्गदर्शक होत्या. ज्या हातांनी शिवबाचा पाळणा हलवला, त्याच हातांनी अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा या महाराष्ट्राच्या मातीत पेरली. आजच्या आधुनिक काळातही स्त्रीशक्ती आणि कर्तृत्वाचे त्या एक अजरामर प्रतीक आहेत.

स्वराज्याची प्रेरणा आणि आदर्श माता

राजमाता जिजाऊंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथे झाला. त्यांचे वडील लखुजीराव जाधव हे त्या काळातील एक पराक्रमी सरदार होते. जिजाऊंना बालपणापासूनच तलवारबाजी, घोडेस्वारी आणि राजकारणाचे धडे मिळाले होते. त्या काळात स्त्रियांना शिक्षण मिळणे कठीण असताना, जिजाऊंनी युद्धकला आणि राज्यकारभारात प्राविण्य मिळवले होते. त्यांचा विवाह शहाजीराजे भोसले यांच्याशी झाला, जो पुढे जाऊन इतिहासाला कलाटणी देणारा ठरला. त्या काळी महाराष्ट्रावर आदिलशाही, निजामशाही आणि मुघलांचे वर्चस्व होते. परकीय आक्रमकांच्या अत्याचाराने रयत होरपळत होती. जिजाऊंनी हे चित्र बदलण्याचे ठरवले. त्यांनी केवळ साश्रू नयनांनी अन्याय पाहिला नाही, तर आपल्या मुलाला - शिवरायांना - एक



असा राजा म्हणून घडवले जो रयतेचे राज्य स्थापन करेल. त्यांनी शिवबांना लहानपणी रामायण, महाभारतातील शौर्यकथा सांगितल्या आणि त्यांच्या मनात अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द निर्माण केली.

प्रशासकीय कौशल्य आणि पुण्याचा कायापालट

शहाजीराजे दक्षिणेत मोहिमेवर असताना, पुण्यातील जहागिरी सांभाळण्याची जबाबदारी जिजाऊंवर आली. आक्रमकांनी पुण्याचे हाल केले होते, तिथे गाढवाचा नांगर फिरवला होता. जिजाऊंनी तिथे सोन्याचा नांगर फिरवून पुण्याची जमीन पुन्हा सुपीक केली आणि रयतेचा विश्वास जिंकला. त्यांनी पुण्यात कसबा गणपती मंदिर उभारले आणि ओसाड पडलेल्या पुण्याला पुन्हा गजबजलेले शहर बनवले. त्या केवळ एक माता नव्हत्या, तर प्रजेच्या सुख-दुःखाची काळजी घेणाऱ्या 'आऊसाहेब' होत्या.

शक्ती आणि धैर्याचे प्रतीक

जिजाऊंचे धैर्य अफाट होते. अफझल खानाचे संकट असो किंवा शिवरायांचा आग्रा येथील वेढा, प्रत्येक कठीण प्रसंगात त्या ढाल बनून स्वराज्याच्या मागे उभ्या राहिल्या. जेव्हा शिवाजी महाराज आग्र्याच्या कैदेत होते, तेव्हा जिजाऊंनी अत्यंत संयमाने आणि कौशल्याने स्वराज्याचा कारभार सांभाळला. आपल्या मुलाला मोहिमेवर पाठवताना त्यांच्या डोळ्यात कधीही भीती नसायची, तर विजयाचा ठाम विश्वास असायचा.

जिजाऊंचा प्रेरणादायी आदर्श

१७ जून १६७४ रोजी शिवरायांचा राज्याभिषेक झाल्यानंतर काही दिवसांनी पाचाड येथे या जिजाऊंनी जगाचा निरोप घेतला. जिजाऊंनी शिकवलेले स्वाभिमान, नीतिमत्ता आणि शौर्याचे संस्कार आजही आपल्याला प्रेरणा देतात. आजचा प्रत्येक माता जर जिजाऊंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मुलांवर संस्कार करेल, तर देशात पुन्हा शिवरायांसारखे तेजस्वी नेतृत्व निर्माण होईल. मुजरा माझा त्या मातेला, जिने घडविला शिवबा विधात्याला!

लेखक - दिनेश बी.पगारे

# राष्ट्रीय युवा दिन : राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती

**दै. आवाज वृत्तसेवा...**

प्रथमतः राष्ट्रीय युवा दिनानिमित्त राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !!

भारताच्या पुनरुत्थानाच्या काळात आणि हिंदू धर्माच्या पुनर्जीवनाच्या काळात ज्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे ; तसेच भारतीय सामान्य जनतेला दयनीय अवस्थेतून आणि अज्ञानातून सोडविण्यासाठी ज्यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य केले , तसेच केवळ भारतातच नव्हे तर जगभरात तरुणांनी प्रेरणा घ्यावी असा नावलौकिक ज्याने मिळविला तसेच ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरिकेमध्ये शिकागो येथे सर्व धर्म परिषद सुरू झाली त्यामध्ये ज्यांनी आपल्या भाषणातील पहिलेच वाक्य : अमेरिकेतील माझ्या बंधू आणि भगिनींनो असे उच्चारले . टाळ्यांचा कडकडाट झाला . हिंदू धर्माचा प्रतिनिधी म्हणून बंधू भावाचं नातं जोडणाऱ्या , विश्वबंधुत्वाचा संदेश देऊन अवघ्या पाच मिनिटात सर्वांची मने ज्यांनी जिंकली , त्यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी झाला . मित्रहो त्यांचे नाव आहे नरेंद्र अर्थात स्वामी विवेकानंद .

मित्रहो अवघे ४० वर्षाचे आयुष्य जणांना लाभले त्या स्वामी विवेकानंदांनी लहानपणापासूनच देशाची सेवा केली . त्यांचं स्मरण म्हणून त्यांचा जन्म दिवस दिनांक १२ जानेवारी हा दिवस १९८५ पासून संपूर्ण देशभर राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो. विवेकानंदांच्या बालपणाची गोष्ट आजही आठवते . विवेकानंदांचे वडील विश्वनाथ बाबू एक निशांत वकील होते . त्यांच्या घरी एक छानशी घोडागाडी होती . ती चालवायला




गाडीवान होता . हा गाडीवान मोठा रुबाबदार .दिसे . तो मुळात अंगाने धष्टपुष्ट ,उंच पुरा होता . त्याने आकडेबाज मिशा राखलेल्या होत्या , डोक्यावर पांढरी पगडी , निळ्या रंगाचा पेहराव ,कंबरेला पट्टा, त्यावर पितळी बिल्ला लावलेला . त्यामुळे तो आणखीनच रुबाबदार दिसे .

त्यांच्याकडे पाहून नरेंद्रला वाटे की,आपण पुढे भविष्यात यांच्यासारखे व्हावे . ऐटीत गाडी चालवावी मग लोक आपल्याकडे पाहतच राहतील .

एकदा विश्वनाथ बाबू नरेंद्रशी गप्पा मारीत बसले होते . गप्पांच्या ओघात वडिलांनी नरेंद्रला सहज प्रश्न केला , बेटा नरेंद्र तू पुढे मोठा झाल्यावर कोण होणार ? नरेंद्रने थाटात उत्तर दिले , मी गाडीवान होणार . एका नामांकित वकिलाच्या मुलाने असे उत्तर द्यावे हे त्यांना आवडले नाही .नरेंद्रची आई भुवनेश्वरी देवी तिथे उभ्या होत्या . त्यांनी पतीची मनस्थिती जाणली आणि तात्काळ नरेंद्रला हाताशी धरले . घराच्या भिंतीवर रथ हाकणाऱ्या श्रीकृष्णाच्या फोटोकडे नेले आणि आई म्हणाली ,अर्जुनाच्या रथाचे सारथ्य करणाऱ्या श्रीकृष्णासारखा तू हो . कृष्णाने रथही हाकला आणि अर्जुनाला ज्ञानही दिल तू तसं कर .

अशा या स्वामी विवेकानंद यांनी केवळ भारतभर ज्ञानदानाचे कार्य करीत असतानाच आपला अंत काळ जवळ आल्याचे त्यांना जाणवले आणि चार जुलै १९०२ रोजी ते पंचतत्वात विलीन झाले .पण आपल्या तेजस्वी विचारांनी आणि कार्याने अमर राहिले .

त्यांनी मानव सेवा हीच ईश्वर सेवा समजली . म्हणून मित्रहो , व्यक्ती शरीराने जाते पण विचारांनी सतत अमर राहते असे . स्वामी विवेकानंद आजही विचारांनी तुमच्या - आमच्या मध्ये अमर आहेत .

भारत हा जगातील सर्वात युवा देश आणि युवकांचा देश समजला जातो .भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ६५ टक्के लोकसंख्या ही युवा लोकसंख्या आहे . म्हणून तुमच्यासारख्या युवकांच्या हातामध्ये देशाचे भवितव्य आणि देशाचे जगाच्या नकाशातील सुरक्षित स्थान अवलंबून आहे . आजच्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांचे विचार , देश प्रेम , धर्मभावना , सद्भावना , राष्ट्रीय ऐक्य हे जर जाणून घेतले आणि ते जर आपल्या आचरणात आणले ; तर खऱ्या अर्थाने आजचा राष्ट्रीय युवा दिन साजरा केल्याचे सार्थक होईल असे मला वाटते .

म्हणून मित्रांनो , जे काम करायचं असेल ते मनापासून करा . त्यातून चांगलेच फळ मिळेल . सकारात्मक विचार करा . मनशांती मिळेल , यशाच्या दिशेने वाटचाल करा , यशाच्या जवळ पोहोचण्याचा प्रयत्न करा . यश आपल्याजवळ येईल . समाज हित लक्षात ठेवा. धर्मभेद, जात भेद बाजूला ठेवून धर्मभावना बाळगा . माझा आजच्या या तरुण पिढीवर निश्चित विश्वास आहे .

मित्रहो , समाज बिघडलाय असं म्हणण्यापेक्षा , समाज घडविण्यासाठी आपण प्रयत्न करूया . आजची तरुण पिढी बिघडत चाललीय असा नकारात्मक विचार करण्यापेक्षा, आजची तरुण पिढी सुधारण्यासाठी आपण काय करूया याचा विचार करा .

मी असे केल्यानंतर मला यश मिळेल का ? यापेक्षा मला यश मिळविण्यासाठी काय करावे लागेल याचा सकारात्मक विचार करा . देशातली सामाजिक व राजकीय परिस्थिती फार बिघडत चाललीय असे म्हणण्यापेक्षा जगातील अनेक देशांमध्ये सामाजिक व राजकीय परिस्थितीची घडी बिघडलेली असतानासुद्धा आपला देश अतिशय चांगल्या अवस्थेत उभा आहे आणि या देशाला आणखी व्यवस्थित ठेवण्यासाठी एक युवक म्हणून मी काय करू शकतो इतका सात्विक , भावनिक विचार जर केला तर आजचा राष्ट्रीय युवा दिन - स्वामी विवेकानंद यांची जयंती आणि आणि ज्यांनी या अखंड हिंदुस्तानाला जगाचा इतिहासात एका अतिउच्च टोकावर नेऊन , जगातील सर्वोत्तम राजा म्हणून ज्यांची गणना केली जाते अशा छत्रपती शिवरायांच्या मातोश्री - तुमच्या आमच्या आदर्श , आदर्श आई म्हणून ज्यांची संपूर्ण जगभर ख्याती आहे अशा राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी केल्याची सार्थक होईल असे मला वाटते .



**लेखक - भाऊसाहेब किसन महाडदेव**
(कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय विंचूर येथे ज्युनिअर कॉलेज विभागात मराठी विषयाचे अध्यापक आहेत)

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायक्षेत्र) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# सटाण्यात चोरी गेलेले एटीएम अवघ्या चार तासांत हस्तगत, ९.५५ लाख रुपये जप्त

**दै. आवाज वृत्तसेवा...**
भगवान पवार, सटाणा:
शहराजवळील ताहाराबाद रस्त्यावरील यशवंतनगर परिसरात एसबीआय बँकेच्या शाखेजवळ असलेले एटीएम मशीन अज्ञात चोरट्यांनी रकमेसह चोरून नेल्याची धक्कादायक घटना १० जानेवारी २०२६ रोजी उघडकीस आली. या एटीएममध्ये सुमारे २५ लाख रुपये असल्याची माहिती असून, यापैकी ९ लाख ५५ हजार रुपये एटीएममध्येच शिल्लक असल्याचे आढळून आले आहे, तर उर्वरित रक्कम चोरीला गेल्याची खात्री पोलिसांनी केली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, चोरट्यांनी हे एटीएम सटाणा शहरातून चोरून नेऊन थेट साक्री पोलीस हद्दीतील छाईल गावाजवळ फेकून दिल्याची गुप्त माहिती सटाणा पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे सटाणा पोलिसांनी तात्काळ हालचाली करत अवघ्या चार तासांत सदर एटीएम मशीनचा शोध घेतला. पोलिसांनी हे एटीएम ताब्यात घेऊन थेट सटाणा पोलीस स्टेशन येथे आणले.

एटीएम उघडून पाहणी केली असता, त्यामध्ये ५०० व १०० रुपयांच्या नोटांमध्ये एकूण ९ लाख ५५ हजार रुपये आढळून आले. उर्वरित रक्कम चोरीला गेल्याचे स्पष्ट झाल्यानंतर सटाणा पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात व्यक्तींविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या संपूर्ण कारवाईचे नेतृत्व सटाणा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक योगेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या तपास पथकात पोलीस उपनिरीक्षक अतुल बोरसे, पोलीस हवालदार जाधव, जगताप, कोळी, साप्ते यांचा समावेश होता. तसेच साक्री पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक भोळे, पोलीस हवालदार जगताप, गांगुर्डे या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाच्या मदतीने एटीएम हस्तगत करण्यात यश आले.





ही कारवाई दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी सुमारे दुपारी २.४५ वाजता करण्यात आली. या प्रकरणी BNS कलम ३०५ (ई), ३३१ (४), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, चोरीला गेलेल्या उर्वरित रकमेचा व आरोपींचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

या घटनेमुळे सटाणा शहरासह परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांकडून एटीएम सुरक्षेबाबत अधिक सतर्कता ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

एटीएम सुरक्षा जबाबदारी नेमकी कोणाची?
एटीएम मशीन फोडून रक्कम चरीला गेल्याच्या सटाणा शहरात यापूर्वीही अनेक घटना घडल्या असून यापासून एकही बँकेने बोध घेतल्याचे दिसून येत नाही, एकही एटीएम च्या बाहेर सुरक्षा रक्षक नेमलेले नसून यामुळेच एटीएम फोडल्याच्या घटना वारंवार घडताना दिसून येत आहेत परंतु याचा ताण सर्वात जास्त पोलिसांवर पडत असून अगोदरच सटाणा पोलीस स्टेशन ला कर्मचारी संख्या कमी असल्यामुळे कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण पडल्याचे दिसून येत आहे.

## अश्विनी सांगळेंना साई जीवन गौरव समाज भूषण पुरस्कार प्राप्त

**दै. आवाज वृत्तसेवा...**
दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी - ओम साई विकास प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित साई जीवन गौरव समाजभूषण पुरस्कार सोहळ्याचे आयोजन शिर्डी येथे करण्यात आले होते.



कार्यक्रमाचे मुख्य आयोजक सुदान संसारे होते. कुमारी अश्विनी बाळकृष्ण सांगळे यांचे निवेदन क्षेत्रातील दखल घेऊन त्यांना उत्कृष्ट निवेदिका या राज्यस्तरीय पुरस्काराने प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सन्मानित करण्यात आले.

यावेळी सोहळ्यात श्री.किशोरजी कालडा शेठ.संगमनेर.अध्यक्ष.राष्ट्रीय शरीर सौष्टव स्पर्धा श्री.उतम काका घोगरे पाटील लोणी प्रवरा आकांक्षा कुंभार अभिनेत्री. श्री.मुकेश ओबेरॉय. नाशिक.डॉन फार्मा. नाशिक, डॉ.अरुण गायकवाड. प्रिन्सिपल संगमनेर कॉलेज, श्री.अल्ताफ शेख. पुणे. लेखक, दिग्दर्शक. डॉ. धरमवीर सहाणे.मैड हॉसपिटल. राहाता, श्री.योगेश पवार अभिनेता श्री.अमित पाटील. अभिनेता डॉ.सुरेश गुडदे. प्राध्यापक संगमनेर कॉलेज डॉ.जितेंद्र पाटील प्राध्यापक संगमनेर कॉलेज ॲड.सतिषचंद्र सुद्रिक,कायदा विषयावर तज्ञसुप्रीम कोर्ट वकील.पत्ता अहिलयानगर,श्री.सुदाम संसारे.

अध्यक्ष तथा संस्थापक.लेखक दिग्दर्शक,निर्माता,अभिनेता. हे सर्व मान्यवर पाहुणे उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी सांगळे यांनी केले.

## धामोरी येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान

**दै. आवाज वृत्तसेवा...**
चास नळी: पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून सत्य, न्याय व जनहित जपण्याची मोठी जबाबदारी पत्रकारांवर आहे, असे प्रतिपादन न्यू इंग्लिश स्कूल धामोरीचे मुख्याध्यापक एस. टी. बागल यांनी पत्रकार दिनानिमित्त आयोजित सत्कार सोहळ्यात केले.

कोपरगाव तालुक्यातील धामोरी येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये पत्रकार दिनाचे औचित्य साधत स्थानिक पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता सरस्वती मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व पूजनाने करण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार किरणकुमार आवारे, भाऊसाहेब हुजबंद, निवृत्ती शिंदे, दत्तात्रय घुले, काकासाहेब खर्डे, मोहन जाधव, नवनाथ उल्हारे व मुन्नाभाई शेख यांचा शाल, ग्रेटिंग कार्ड, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

मुख्याध्यापक बागल पुढे म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात माहितीचा वेग वाढला असला तरी सत्यता, जबाबदारी व सामाजिक बांधिलकी जपणे आवश्यक असून विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन व चिकित्सक विचारांची सवय लावावी. याप्रसंगी उपस्थित पत्रकारांनी पत्रकारितेचे स्वरूप, समाजातील भूमिका व जबाबदारी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास विद्यालयाचे पर्यवेक्षक जगदाळे एस. बी., उपशिक्षक गायकवाड बी. एम., जेजुरकर एस. एन., सौ. कातकडे जे. एस., सौ. गागरे बी. एस., निकम एम. एस., ठाकूर एस. एस., कडाळे एस. एन., सौ. पावरा एल. एस., घोडे एस. जी., श्रीमती जायभाये सी. आर., जुमडे एम. एम., माळोदे बी. जे., वरिष्ठ लिपिक गोसावी जी. एस., पूर्णवेळ ग्रंथपाल बर्फे डी. जी., प्रयोगशाळा सहाय्यक आहिरे एन. एस., उपशिक्षिका सोनवणे एम. बी., संगणक शिक्षिका कु. अंजली वाघ तसेच कर्मचारी सुनील तुंबारे मामा व सोनवणे मामा, विद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लासलगाव येथे नवनिर्वाचित ग्रामपंचायत पदाधिकारी यांचा सत्कार सोहळा

**दै. आवाज वृत्तसेवा...**
लासलगाव प्रतिनिधी - महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियन NGP ४५११ संघटनेची नाशिक जिल्हा कमिटी ची सभा युनियन चे राज्य सरचिटणीस मा. गिरीश भाऊ दाभाडकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळेस नव्याने जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली. व नाशिक तालुका संघटनेची तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली. या कार्यकारणी सदस्य यांचा सत्कार लासलगाव परिसरातील ग्रामपंचायत कर्मचारी यांनी लासलगाव येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आला होता.यावेळी नवनिर्वाचित उपाध्यक्ष निसार शेख, संघटक नारायण वेताळ, प्रसिद्धी प्रमुख गणेश ठाकरे यांचा सत्कार भारतमाता संस्थेचे अध्यक्ष व पत्रकार शरद लोहकरे, नाशिक जिल्हा उपविभागीय अध्यक्ष सुभाष घोलप, मा.जिल्हा सचिव बाबासाहेब गीते, संजय विसपुते यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी ग्रामपंचायत कर्मचारी श्री. भावराव गोधडे,संतोष शिंदे, संतोष भुजबल, दिलीप जाधव, दिपक संसारे, अमृत डोमाडे उपस्थित होते.



**नाशिक जिल्हा कार्यकारी**
बापूसाहेब मोरे (अध्यक्ष), निसार भाई शेख (उपाध्यक्ष) निलेश नवले. (उपाध्यक्ष) अशोक ढिकले (उपाध्यक्ष) महेंद्र मते (सचिव) सदानंद देवरे (सह सचिव) सुनिल नाठे. (कार्याध्यक्ष), गणेश ठाकरे (प्रसिद्धी प्रमुख) गोपीनाथ गांगुर्डे (कोषाध्यक्ष) शंकर साठे (सल्लागार) नारायण वेताळ, वसंत खाडे,जयराम भोये, मल्हारी गोईकने, मनोहर बेंडकुळे, विद्याधर क्षिरसागर यांची संघटक पदी निवड झाली.

## विंचूरच्या कर्मवीर विद्यालयात आनंद मेळावा उत्साहात साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**
विंचूर - येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात बाल आनंद मेळावा व पत्रकार सन्मान सोहळा उत्साहात साजरा झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष जगदीश जेऊघाले हे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य डॉ सुजित गुंजाळ हे होते. मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजनाने कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.



यावेळी प्राचार्य नंदकुमार देवढे यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यार्थ्यांचे व्यवहार ज्ञान वाढावे व आर्थिक साक्षरता वाढावी या उद्देशाने बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.




# सत्यगावला वामनभाऊंची पन्नासावी पुण्यतिथी साजरी




**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपकढोकळे,पिंपळगावलेप:प्रतिनिधी सत्यगाव (ता.येवला) शनिवार दि.१० जानेवारी रोजी ग्रामस्थ, वारकरी भजनी मंडळी व भाविकांच्या उपस्थितीत संत वामनभाऊ यांचा ५० वा पुण्यतिथी उत्सव आनंदात व भक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला यावेळी पूजन,आरती व प्रसाद वाटप करण्यात आले.संत वामनभाऊ महाराज हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील एक अत्यंत प्रभावशाली आणि लोकपूज्य संत होते.ते भक्ती, कीर्तन,नामस्मरण आणि समाजप्रबोधन यांच्या माध्यमातून सामान्य जनतेमध्ये अध्यात्मिक जागृती निर्माण करणारे संत म्हणून ओळखले जात होते. संत वामनभाऊ हे सत्यगाव मध्ये दोन ते तीन वेळा येऊन गेले होते त्यामुळे त्यांची सत्यगाव सोबत जवळचे आणि घनिष्ठ संबंध देखील होते.संत वामनभाऊ महाराजांनी सत्यगावात वारकरी संप्रदायाची भक्कम पायाभरणी केली.

हरिपाठ, अभंग, गायन, भजन कीर्तन यांच्या माध्यमातून विठ्ठलभक्तीचा प्रसार त्यांनी घराघरात केला अशी माहिती बाळकृष्ण सांगळे यांनी दिली.

# ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ.माधव गाडगीळ यांचे पुण्यात निधन

**दै. आवाज वृत्तसेवा...**



पुणे : भारतातील पर्यावरण चळवळीचे प्रमुख स्तंभ आणि पश्चिम घाटांच्या संरक्षणासाठी आयुष्य वेचणारे ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ (वय ८३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ७ जानेवारी २०२६ रोजी रात्री उशिरा पुण्यात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या मुलाने सिद्धार्थ गाडगीळ यांनी ही दु:खद बातमी जाहीर केली.

डॉ. गाडगीळ हे पश्चिम घाट पर्यावरण तज्ज्ञ समितीचे (गाडगीळ समिती) अध्यक्ष होते. त्यांच्या २०११ च्या अहवालाने पश्चिम घाटांच्या संरक्षणासाठी कठोर शिफारसी केल्या होत्या, ज्यामुळे मोठी चर्चा आणि वाद निर्माण झाला होता. तरीही, केरळ आणि महाराष्ट्रातील पूर व भूस्खलनासारख्या आपत्तींनंतर त्यांच्या शिफारसींचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले.

त्यांनी भारताचा पहिला बायोस्फियर रिझर्व्ह (निलगिरी बायोस्फियर रिझर्व्ह) स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. जैवविविधता कायदा २००२ आणि वन अधिकार कायदा २००६ च्या मसुद्यातही त्यांचा मोठा वाटा होता. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (IISc) बेंगळुरू येथे त्यांनी सेंटर फॉर इकोलॉजिकल सायन्सेसची स्थापना केली.

डॉ. गाडगीळ यांना पद्मश्री (१९८१), पद्मभूषण (२००६) आणि २०२४ मध्ये संयुक्त राष्ट्रांचा सर्वोच्च पर्यावरण पुरस्कार 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' जीवनगौरव पुरस्कार मिळाला होता. त्यांच्या निधनाने पर्यावरण क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. जयराम रमेश, मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला.

# मराठी युवा गझलकारांसाठी भव्य गझल स्पर्धेचे आयोजन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई, (प्रतिनिधी) - मराठी साहित्य क्षेत्रात नवोदित व युवा गझलकारांना प्रोत्साहन देण्यासाठी गझलमंथन साहित्य संस्थेच्या वतीने भव्य मराठी युवा गझल स्पर्धा २०२६ आयोजित करण्यात आली आहे. तसेच या स्पर्धेच्या माध्यमातूनच अखिल भारतीय युवा गझल संमेलन आणि युवा गझलकारांचा गझलसंग्रह प्रकाशित करण्यात येणार आहे. नव्या वर्षात मराठी गझलेच्या चळवळीला नवी दिशा देणारा हा उपक्रम ठरणार आहे.

या स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिकांसह सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच स्पर्धेसाठी आलेल्या प्रवेशिकांमधील निवडक व उत्कृष्ट गझलांचा प्रातिनिधीक गझलसंग्रह प्रकाशित करण्यात येणार आहे. याचबरोबर आगामी अखिल भारतीय युवा गझल संमेलनासाठी स्पर्धकांचा प्राधान्याने विचार केला जाणार असून, त्याच संमेलनात पारितोषिक वितरण व गझलसंग्रहाचे प्रकाशन होणार आहे.

अखिल भारतीय युवा गझल संमेलनात एका युवा गझलकाराला 'गझलमंथन युवा गझलकार पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. संमेलनाची तारीख तसेच पुरस्कारार्थीचे नाव लवकरच जाहीर करण्यात येईल, असे आयोजकांनी कळविले आहे.




या स्पर्धेसाठी गझल पाठविण्याची अंतिम मुदत ३१ मार्च २०२६ असून, त्या दिवशी ३५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी वय असलेले मराठी युवा गझलकार या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

पारितोषिके पुढीलप्रमाणे देण्यात येणार आहेत : प्रथम - रु. २५०० व सन्मानचिन्ह व सन्मानपत्र, द्वितीय रु. १५०० व सन्मानचिन्ह व सन्मानपत्र, तृतीय रु. १००० व सन्मानचिन्ह व सन्मानपत्र, उत्तेजनार्थ (१) रु. ५०० व सन्मानचिन्ह व सन्मानपत्र, उत्तेजनार्थ (२) रु. ५०० व सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे पारितोषिकांचे स्वरूप असणार आहे.

या स्पर्धेसाठी पारितोषिक प्रायोजक म्हणून श्री. आबा पेडणेकर (रसिका थिएटर्स), प्रातिनिधीक गझलसंग्रहासाठी डॉ. कैलास गायकवाड, तर युवा गझलकार पुरस्कारासाठी श्री. महेश होनमाने यांनी प्रायोजन केले आहे. स्पर्धेचे परीक्षण डॉ. शिवाजी काळे आणि डॉ. स्नेहल कुलकर्णी हे करणार आहेत.

स्पर्धकांनी आपली फक्त एकच गझल खालीलपैकी एका संकलकाकडेच व्हॉट्सपद्वारे पाठवावी. संकलक सुधिर महाजन (९२७३७७७५१४), प्रणाली म्हात्रे (८७७९८७९४४६), अनंत देशपांडे (८३७९९६४५५०), महेश होनमाने (९९२३५२५५३३), स्नेहा शेवाळकर (८३२९०६४७५५), डॉ. मंदार खरे (९३७१०२६८४८), चेतन पवार (९६०४२४२३३४) यांच्याकडे गझल पाठवावी, असे आवाहन गझल मंथन साहित्य संस्थेचे अध्यक्ष अनिल कांबळे, उपाध्यक्ष वसुदेव गुमटकर, सचिव जयवंत वानखडे, मुशायरा समिती अध्यक्ष काशिनाथ गवळी व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

**भरत माळी**
**मो. ९४२०१६८८०६**
**प्रसिद्धीप्रमुख, गझल मंथन साहित्य संस्था.**

# राज्य क्रीडा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई, दि. ८ : ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांचा जन्मदिन १५ जानेवारी राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या अनुषंगाने १२ ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत राज्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध क्रीडाविषयक उपक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन क्रीडा विभागातर्फे करण्यात आले आहे.

ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करणे तसेच नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याअंतर्गत मुंबई उपनगर जिल्ह्यात १२ ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत शाळा व महाविद्यालयांमध्ये पुढील उपक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व क्रीडा क्षेत्रातील त्यांचे योगदान याविषयी व्याख्याने, क्रीडा संस्कृतीचे जतन व संवर्धनासाठी रॅली, मॅरेथॉन स्पर्धा, शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध खेळांवरील नियमावली, ऑलिम्पिक स्पर्धांसह अन्य महत्त्वाच्या स्पर्धांबाबत माहिती देणारी मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात यावीत. तसेच ऑनलाईन माध्यमातून नामवंत खेळाडूंशी विद्यार्थ्यांचा संवाद, विविध खेळांचे प्रदर्शनीय सामने, विजेत्यांना पुरस्कार वितरण तसेच आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडूंचा गौरव करण्यात यावा. राज्य क्रीडा दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांच्या ठिकाणी जिल्हा क्रीडा कार्यालयाचा बॅनर लावणे अत्यावश्यक व अनिवार्य राहील.

या सर्व उपक्रमांचा सविस्तर अहवाल खर्पीरसीरा ठशशश्र, र्धोर्डीलश ध्वनिफित स्वरूपात तयार करून वीर्ीािलरळी-र्ीलसारळश्र.लो या ई-मेल आयडीवर पाठविण्यात यावा. उत्कृष्ट नियोजन व प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या प्रथम तीन क्रमांकांच्या संस्थांना अनुक्रमे १०,०००, ७,००० व ५,००० रोख पारितोषिक, गौरवपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे, असे आवाहन मुंबई उपनगरच्या जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

# सावरगाव विद्यालयात स्व. पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त वक्तृत्व व रांगोळी स्पर्धा..!

**दै. आवाज वृत्तसेवा...**



लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : शिक्षण प्रसारक मंडळ नगरसुल शिक्षण संस्थेचे संस्थापक,तालुक्यातील पहिले शिक्षणसम्राट स्व.मुरलीधर गंगाधर पाटील उर्फ आण्णाबाबा यांना पुण्यतिथीनिमित्त न्यू इंग्लिश स्कुल सावरगाव विद्यालयात अभिवादन करण्यात आले.

विद्यालयात झालेल्या पुण्यतिथी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते विलासराव काटे होते तर कचूनाना काटे, भगवान काटे,प्राचार्य डी.बी. नागरे,पर्यवेक्षिका सविता सौंदाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते स्व.आण्णाबाबा यांचा प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. पुण्यतिथीनिमित्त घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेच्या दालनाचे उद्घाटन फित कापून विलासराव काटे,कचूनाना काटे यांच्या हस्ते करण्यात आले.विद्यार्थी व विद्यार्थीनीनी अतिशय देखण्या व आशयसंपन्न रांगोळ्या काढल्या.या रांगोळ्यातून प्रथम तीन क्रमांक काढून त्यांना वार्षिक पारितोषिक वितरणात बक्षिसे देण्यात येणार आहे. १९६३ मध्ये नगरसुल सारख्या गावात संस्थेची मुहूर्तमेढ रोवून अण्णाबाबांनी खेड्यापाड्यापर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली.

अल्पावधीत सावरगाव, भारम, तळवाडे येथेही त्यांनी शाळा सुरू करून ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा अगदी तळागाळापर्यंत, गोरगरीबापर्यंत पोहाचावली. संस्थेच्या माध्यमातून केलेले कार्य दैदिप्यमान आहे. त्यांच्यामुळे येवल्यासारख्या दुष्काळी तालुक्याच्या ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा पोहोचली आणि हजारो विद्यार्थी उच्च शिक्षणापर्यंत पोहोचू शकले असे प्रतिपादन यावेळी मनोगत व्यक्त करताना प्राचार्य नागरे, पर्यवेक्षिका सौंदाणे, ज्येष्ठ शिक्षक गजानन नागरे, उमाकांत आहेर, सगुणा काटे यांनी सांगितले. वसंत विंचू यांनी सूत्रसंचालन केले,संतोष विंचू यांनी आभार मानले.

*वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन पुण्यतिथीच्या निमित्ताने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.लहान गटात अंश तिवारी, अक्षरा सोनवणे व अनिरुद्ध घोडेराव यांनी तर मोठया गटात समिक्षा मस्के, अक्षदा वाघ, कार्तिकी घोडेराव यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. प्रथम तीन क्रमांकाना विलासराव काटे व गजानन नागरे यांनी रोख बक्षिसे देऊन गौरवले. जेष्ठ शिक्षिका अंजना पवार,उमाकांत आहेर, सगुणा काटे,भाग्यश्री सोनवणे यांनी परीक्षण केले.

दरम्यान, विद्यालयात अण्णाबाबांच्या पुण्यतिथी ते जयंती या कालावधीत स्मृती पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे.यानिमित्ताने क्रीडा स्पर्धा, आनंद मेळा, विविध डे, गुणदर्शन तसेच वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात येणार असल्याचे प्राचार्य नागरे यांनी सांगितले.

